—: प्रेसनोट :— दि.०७/११/२०१९

फिर्यादी यांचे ग्राहकाचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रदद न करण्याकरीता आलोसे यांनी फिर्यादीकडे रु.१५०००/— रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु.४०००/—लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३५/२०१९ |
| कलम | ७ भ्र.प्र.अधिनियम (संशोधन) १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | आरोपी :— श्रीमती माधुरी अनिल चव्हाण, वय ५३, पद— विक्रीकर अधिकारी, वस्तु व सेवाकर ४ था माळा, ए विंग, बी.के.सी. रोड, बांन्द्रा, पुर्व, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १५,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ४,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे सेवा व वस्तुकर (जी.एस.टी.) कर सल्लागार असुन त्यांनी त्यांच्या व्यवसायीक ग्राहकांचे मासीक सेवा वस्तु कराची रिटर्न फायलिंग केली नाही. त्यावरुन आलोसे यांनी फिर्यादी यांच्या व्यवसायीक ग्राहकांना संपर्क करुन त्यांचा जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रदद करण्यात येईल असे सांगितले. सदर बाब ग्राहक यांनी फिर्यादी यांना सांगितली.<br>त्याअनुषंगाने फिर्यादी हे आलोसे यांना दि.०४/११/२०१९ रोजी भेटले असता आलोसे यांनी त्यांचे ग्राहकांच्या दोन फायलींगचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रदद न करण्याकरीता रु.१५,०००/— रक्कमेची मागणी केली.<br>सदरची रक्कम फिर्यादीस लोकसेवक यांना दयावयाची नसल्याने फिर्यादीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे दि. ०६/११/२०१९ रोजी सायंकाळी १७.०० वा. प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांच्या तक्रारी वरुन आज दि.०७/११/२०१९ रोजी तक्रारीची पडताळणी केली असता, आलोसे यांनी एक फाईल क्लिअर करण्याकरीता रु.४०००/—रक्कमेची लाचेची मागणी करुन स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले. फिर्यादी यांनी आलोसे यांचेविरुध्द दिलेल्या तक्रारी वरुन लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाकडुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

( वंदना नारकर )
अपर पोलीस उप आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned by CamScanner